# घटक - राज्यपाल

* केंद्राप्रमाणे राज्यातही संसदीय शासनप्रणाली.
घटनेचा भाग - ६ - राज्याशी संबंधित -
हा भाग जम्मू-काश्मीर राज्याला लागू नाही. (स्वतंत्र राज्यघटना)
कलम १५३ ते १६७ - राज्यातील कार्यकारी विभागाशी संबंधित.
राज्य कार्यकारी विभागात - राज्यपाल, मुख्यमंत्री, मंत्रिमंडळ, राज्याचा महाधिवक्ता.
राज्यपाल - राज्याचा मुख्य कार्यकारी अधिकारी - नामधारी किंवा घटनात्मक प्रमुख
तसेच केंद्र सरकारचा प्रतिनिधी - दुहेरी भूमिका -
साधारणपणे प्रत्येक राज्याला राज्यपाल
७वी घ.दु → अधिनियम १९५६ अन्वये दोन किंवा अधिक राज्यांना एकच व्यक्ती राज्यपाल म्हणून नियुक्त करणे शक्य झाले आहे.

**नियुक्ती** - प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष निवडला जात नाही.
राष्ट्रपती त्याची नियुक्ती करतात.
१९७९ - हे पद घटनात्मक ⟶ सर्वोच्च न्यायालय.

**पात्रता** : भारताचा नागरिक
वयाची ३५ वर्षे पूर्ण.
राज्याबाहेरचा असावा → असा संकेत.

**अटी** : ① संसदेचा/राज्य विधिमंडळाचा सदस्य नसावा
② लाभाच्या पदावर नसावा.
③ राजभवन / निवासस्थान वापरता येईल.
④ संसद ठरवेल त्याप्रमाणे वेतन व भत्ते.
⑤ त्याच्या कार्यकालात वेतन व भत्ते कमी करता येत नाही.
⑥ दोन राज्यांचा राज्यपाल असेल तर वेतन व भत्त्यांची त्यांच्यात विभागणी.

**वेतन** - सन २००८ मध्ये ३६,००० वरून १,१०,००० इतके
२०१८ मध्ये १,१०,००० वरून ३,५०,००० इतके → सध्याचे -

विशेषाधिकार → त्याच्या अधिकृत कामासंदर्भात त्याला कायदेशीर दायित्वापासून वैयक्तिक संरक्षण.
वैयक्तिक कृतीसाठी फौजदारी प्रक्रियेपासून संरक्षण -
अटक / तुरुंगवास देता येत नाही.
वैयक्तिक कृतीसाठी दोन महिन्यांची सूचना देऊन दिवाणी प्रक्रिया सुरु करता येते.

शपथ ⟹ उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधिश त्याच्या अनुपस्थितीत उपलब्ध असलेला ज्येष्ठ न्याया.

कार्यकाल ⟹ पदग्रहण केल्यापासून ५ वर्षे. - परंतु हा कार्यकाल राष्ट्रपतीच्या मर्जीवर अवलंबून.
राष्ट्रपतीची मर्जी याबाबत न्यायालयात जाता येत नाही.
एका राज्यात नियुक्त केलेल्या राज्यपालाची उरलेल्या कालावधीसाठी राष्ट्रपती दुसऱ्या

Scanned by CamScanner

राज्यामध्ये बदली करू शकतो.

कार्यकाल संपलेल्या राज्यपालांची त्याच किंवा दुसऱ्या राज्यात पुनर्नियुक्ती करता येते.

नवीन राज्यपाल नियुक्त होईपर्यंत अगोदरचा राज्यपाल पदावर राहतो.

## अधिकार व कार्ये

जवळजवळ सर्व अधिकार राष्ट्रपती प्रमाणे फक्त परराष्ट्रव्यवहार विषयक, सैनिकी किंवा आणिबाणी विषयक अधिकार नाहीत.

वर्गीकरण :

① कार्यकारी अधिकार

i) कार्यकारी कृती त्याच्या नावाने.

ii) मुख्यमंत्री व इतर मंत्र्यांची नियुक्ती - छत्तीसगड, म.प्र., झारखंड, ओडिशा - आदिवासी कल्याण मंत्री

iii) राज्याच्या महाधिवक्त्याची नियुक्ती (राज्यपालाची मर्जी असेपर्यंत पदावर)

iv) राज्याचा निवडणूक आयुक्त, ~~उच्च~~ राज्य लोकसेवा आयोग अध्यक्ष व सदस्य, नियुक्ती फक्त.

v) मुख्यमंत्र्याकडून प्रशासकीय माहिती मागवू शकतो.

vi) एखाद्या बाबीवर मंत्र्याने निर्णय घेतला असेल पण मंत्रिमंडळाने त्यावर विचार केला नसेल तर ती बाब मंत्रिमंडळाच्या विचारार्थ मांडावी असे मुख्यमंत्र्याला सांगू शकतो.

vii) राज्यात आणीबाणी लागू करावी - शिफारस राष्ट्रपतीला करू शकतो.

viii) संबंधित राज्यातील विद्यापीठांचा कुलपती असतो. - कुलगुरूची नियुक्ती करतो.

② कायदेविषयक अधिकार

i) अधिवेशन बोलावणे / स्थगित करणे, विधानसभा विसर्जित करणे.

ii) सार्वत्रिक निवडणुकीनंतरच्या पहिल्या व प्रत्येक वर्षाच्या पहिल्या अधिवेशनाला संबोधित करणे.

iii) प्रलंबित विधेयकासंदर्भात (गृहामध्ये) गृहांना निरोप पाठवणे.

iv) सभापती / उपसभापतीपद रिक्त असताना कोणत्याही सदस्याची नियुक्ती करू शकतो.
अध्यक्ष / उपाध्यक्ष ———— " ————.

v) विधानपरिषदेवर 1/6 सदस्यांचे नामनिर्देशन

vi) विधानसभेवर 1 अँग्लो इंडियन —— " ——.

vii) विधेयकाबाबत : ① मान्यता देऊ शकतो
② मान्यता देणे राखून ठेवू शकतो.
③ अर्थ विधेयक नसेल तर पुनर्विचारार्थ पाठवू शकतो.
④ राष्ट्रपतीच्या विचारार्थ विधेयक राखून ठेवू शकतो → पुढील परिस्थितीत.
① घटनाबाह्य
② मार्गदर्शक तत्त्वा विरोधी
③ देशहित विरोधी
④ कलम 31 ए अंतर्गत मालमत्ता अधिग्रहण करण्यासंबंधी.
⑤ उच्च न्यायालयाचे स्थान धोक्यात आणणारे असेल तर राखून ठेवणे बंधनकारक.

viii) अध्यादेश काढू शकतो - प्रक्रिया राष्ट्रपती अध्यादेशा सारखीच.

10) राज्यपालद्वारे वित्त आयोग, राज्य लोकसेवा आयोग, नवेच नियंत्रक व महालेखापाल यांचा राज्याशी संबंधित लेखा अहवाल राज्य विधिमंडळापुढे मांडला जातो.

## आर्थिक अधिकार

① राज्य आर्थिकपत्र राज्य विधिमंडळात सादर होईल हे सुनिश्चित करणे
② त्याच्या पूर्वपरवानगीनेच अर्थविधेयक मांडता येते
③ त्याच्या शिफारशी शिवाय अनुदानाची मागणी करता येत नाही.
④ आकस्मिक खर्चाला परवानगी देणे.
⑤ दर पाच वर्षांनी राज्य वित्त आयोगाची स्थापना करतो.

## न्यायिक अधिकार

① राज्याच्या कार्यकारी अधिकार क्षेत्रात येणाऱ्या कोणत्याही कायद्याविरुद्ध केलेल्या अपराधासाठी – शिक्षेमध्ये सूट, सवलत, किंवा माफी देऊ शकतो किंवा स्थगित करू शकतो. किंवा शिक्षेचे स्वरूप बदलू शकतो किंवा कालावधी कमी करू शकतो.
② उच्च न्याया. मुख्य न्यायाधीशांची नियुक्ती करताना – त्याच्याशी विचारविनिमय
③ उच्च न्याया मुख्य न्यायाधिशाशी विचार विनिमय करून जिल्हा न्यायाधिशाची नियुक्ती, पदनियुक्ती व पदोन्नती करतो.
④ उच्च न्यायालयाशी आणि राज्य लोकसेवा आयोगाशी विचारविनिमय करून न्यायीक सेवेतील इतर नियुक्त्या करतो.

## राज्यपालाचे घटनात्मक स्थान

* राज्यपाल नामधारी प्रमुख (विवेकाधिकारातील बाबी वगळता)

कलम १५४ – राज्याचे कार्यकारी अधिकार राज्यपालाच्या नावे.
कलम १६३ – त्याला सल्ला देण्यासाठी (मुख्यमंत्र्याच्या नेतृत्वाखाली) मंत्रिमंडळ

## स्थान राष्ट्रपतीपेक्षा भिन्न.

① राज्यपालास विवेकाधिकारानुसार काम करावे लागेल असे घटनेस अपेक्षित पण राष्ट्रपती बाबत अशी शक्यता नाही.
② ४२ वी घ. दु. – मंत्रिमंडळाचा सल्ला राष्ट्रपतींवर बंधनकारक. राज्यपालाबाबत अशी तरतूद नाही.

## राज्यपालाचा विवेकाधिकार

① विधेयक राष्ट्रपतीच्या विचारार्थ राखून ठेवणे
② राज्यात राष्ट्रपती शासन लागू करणेबाबत शिफारस करणे.
③ लगतच्या संघराज्य प्रदेशाची प्रशासनिक कार्ये करणे.

Scanned by CamScanner

(5) खनिज उत्पादनाच्या परवान्यातून मिळणाऱ्या स्वामित्व अधिकारासाठी आसाम, मेघालय, त्रिपुरा आणि मिझोराम या राज्यांनी स्वायत्त जिल्हा परिषदांना द्यावयाची रक्कम ठरवणे.

घटनेत स्पष्टपणे न मांडलेले विवेकाधिकार

(1) बहुमत नसते / उत्तराधिकारी नसतो त्यावेळी मुख्यमंत्र्याची नियुक्ती करणे.

(2) विश्वासदर्शक ठराव संमत करून घेण्यास अपयश ठरलेल्या मंत्रिमंडळाला पदच्युत करणे.

(3) बहुमत गमावल्यास विधानसभा विसर्जित करणे.